# फळबाग लागवड

**सर्वसाधारण सुचना-**

१. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई हे प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड या घटकाकरिता राज्य स्तरावरील संनियंत्रक आहेत. क्षेत्रीय पातळीवर कृषि विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांनी प्रकल्पांतर्गत सुचनाप्रमाणे या प्रकल्प घटकाची अमंलबजावणी करावी.
२. प्रकल्पांतर्गत खालील नमूद बहुवार्षिक फळपिकांच्या लागवडीसाठी राज्याच्या "भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या मार्गदर्शक सुचना सन २०१८-१९" नुसार अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील, तथापि फळपिके निश्चीत करतांना "राज्याच्या कृषि-हवामान क्षेत्रानुकूल असणाऱ्या फळांच्या व त्यांच्या प्रजातींच्या-कलमांच्या' लागवडीसाठी अर्थसहाय्य देय राहील".
३. प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडीचा कालावधी माहे मे ते नोव्हेंबर असा राहील.
४. यासाठी प्रत्येक गावाकरिता त्या गावाचे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने मंजूर केलेल्या सविस्तर प्रकल्प आराखड्यातील मंजूर केलेल्या फळपिकनिहाय क्षेत्रास अधिन राहून लाभार्थी निवड करावी.
५. प्रकल्पांतर्गत बहुवार्षिक फळबागांच्या लागवडीसाठी ३ वर्ष कालावधीत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षी अनुक्रमे ५०%, ३०% व २०% या प्रमाणात अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.
६. फळबाग लागवडीसाठी निवड झालेल्या पात्र शेतक-यांना फळबाग लागवडीबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.
७. फळबाग लागवडीपूर्वी सदर क्षेत्रातील माती परिक्षण करण्यात यावे.

## योजनेतर्गत लागवडीसाठी पात्र फळपिके ( कलमे)

१. आंबा २. डाळींब ३. पेरु ४. सिताफळ ५. आवळा ६.कागदी लिंबू ७. संत्रा ८. मोसंबी

**क्षेत्र मर्यादा :**

१. प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडीकरिता प्रति शेतकरी कमाल २ हेक्टर पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. एकूण २ हे. किंवा त्या पेक्षा कमी जमीन धारणा असलेल्या शेतक-यांची निवड या प्रकल्पामध्ये करावी. प्रकल्पामध्ये लाभार्थी शेतक-यांची निवड सदर कमाल क्षेत्र मर्यादेत लाभार्थी त्याच्या इच्छेनुसार एका पेक्षा जास्त फळ पिके लागवडीकरिता देखील पात्र राहील.
२. प्रकल्प गावातील ज्या शेतक-यांना २ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावर लाभ घ्यावयाचा आहे, त्या शेतक-यांना राज्य शासनाच्या "भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड " योजनेमधून २ हेक्टरवरील क्षेत्राकरिता लाभ घेता येईल.
३. लाभधारकाचे ७/१२ च्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर त्यांच्या संयुक्त खात्यावरील ८-अ मधील त्याचे नावे असलेल्या क्षेत्र मर्यादा (२ हे.) पर्यंत लाभ देण्यात यावा. एकूण २ हे. पेक्षा जास्त जमीन धारणा असलेल्या शेतक-यांची निवड फळबाग लागवड या घटकासाठी करु नये.
४. प्रकल्प घटकाकरिता निवड झालेल्या लाभार्थ्याने यापूर्वी राज्य रोजगार हमी योजना वा क्षेत्र विस्ताराच्या अन्य योजनेंतर्गत फळबाग लागवडीकरिता शासकीय अनुदानाचा लाभ घेतला असल्यास, सदर लाभ घेतलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी लाभार्थी पात्र राहतील ( २ हे. या कमाल मर्यादेतून यापूर्वी लाभ घेतलेले क्षेत्र वगळावे).

**लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकर्ष :**

१. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ देण्यात यावा, संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
२. शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे तथापि, जर लाभार्थी ७/१२ उताऱ्यावर संयुक्तपणे खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र बंधनकारक राहील.
३. लागवड करावयाच्या फळपिकासाठी ठिबक सिंचन संचाची उभारणी करण्याकरिता लाभार्थ्याकडे पाणी पुरवठ्याचा स्त्रोत व आवश्यक सुविधा असावी.

४. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास, ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक राहील.

५. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या मालकीची किमान २० गुंठे शेत जमीन असणे बंधनकारक राहील.

**घटकांतर्गत समाविष्ट बाबी :**

१. प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड या घटकांतर्गत पुढील बाबींचा समावेश राहील तसेच, त्यापैकी शेतकऱ्यांनी स्वखर्चाने करावयाची कामे व प्रकल्प अनुदानीत बाबी पुढीलप्रमाणे राहतील

| बाब / कामे | आर्थिक भार |
|---|---|
| **अ. शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची कामे** | |
| १) जमीन तयार करणे<br>२) माती व शेणखत / सेंद्रिय खत मिश्रणाने खड्डे भरणे<br>३) रासायनिक खत वापरुन खड्डे भरणे<br>४) आंतर मशागत करणे<br>५) काटेरी झाडांचे कुंपण (ऐच्छिक) | १००% लाभार्थी शेतकरी |
| **ब. प्रकल्प अनुदानीत बाबी/कामे** | |
| १) खड्डे खोदणे<br>२) कलमे लागवड करणे<br>३) पीक संरक्षण<br>४) नांग्या भरणे<br>५) ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | १०० % नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प |

२. उपरोक्त तक्त्यातील **अ** मधील अ.क्र. १ ते ४ येथील बाबींची कामे लाभार्थी शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची असून यामधील अ.क्र. ५ येथील बाब शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची राहील तसेच, सदर तक्त्यातील **ब** मधील अ.क्र. १ ते ५ येथील बाबींकरिता शेतकऱ्यांना प्रकल्प निधीतून १००% अनुदान देण्यात येईल.

३. लाभार्थ्यांना फळपिक निहाय व त्यांच्या लागवडीच्या अंतरानुसार शासनाचे ज्या बाबींना अनुदान देण्यात येणार आहे त्याचा तपशील या सोबत **परिशिष्ट - अ** येथे नमूद केलेला आहे.

४. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ठिबक सिंचन संचाच्या उभारणीकरिता १००% अनुदान द्यावयाचे आहे. त्याकरिता ठिबक सिंचन संच उभारणीसाठी असलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत प्रचलित मापदंडानुसार प्रकल्प निधीतून अनुदान देण्यात यावे.

**आर्थिक मापदंड :**

१. ठिबक सिंचन संचाकरिता प्रचलित केंद्र पुरस्कृत योजनेच्या मापदंडानुसार (सद्यस्थितीत PMKSY - PER DROP MORE CROP) १००% अनुदानाची परिगणना करण्यात यावी.

२. राज्यस्तरीय समितीने निश्चित केलेले कलमांचे / रोपांचे दर लागू होतील.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या मजूरीच्या दरांमध्ये, प्रधान मंत्री कृषि सिंचन योजनेच्या (अथवा प्रचलित केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन संच उभारणी योजना) मापदंडामध्ये तसेच, कृषि आयुक्तालयाने निश्चित केलेल्या सामुग्रींच्या दरामध्ये सुधारणा झाल्यास, या योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या प्रकल्प अनुदानीत बाबींचे दर त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारीत करण्यात येतील.

**प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य:**

१. या योजनेंतर्गत लाभार्थ्यास एकूण ३ वर्षाच्या कालावधीत ५०:३०:२० प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

२. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये लागू असणारे कलमांचे दर प्रकल्पांतर्गत लागवड करावयाच्या कलमांनाही लागू राहतील.

३. लाभार्थ्याने लावलेली फळ झाडे पहिल्या वर्षी किमान ८०% व दुसऱ्या वर्षी किमान ९०% जगविणे आवश्यक राहील. त्यानुसार फळझाडे जगविण्याचे प्रमाण न राखल्यास, लाभार्थी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीच्या अनुदानास पात्र असणार नाही.

४. प्रतिवर्ष देय असलेले अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर DBT द्वारे वर्ग करावे.

५. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत फळपिक निहाय तसेच, पिकांमधील अंतरानुसार खर्च व अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली असली तरी प्रत्यक्ष खर्च जर मापदंडानुसार निश्चित केलेल्या खर्चापेक्षा कमी आला असेल तर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष खर्चाएवढेच अनुदान अनुज्ञेय राहिल.

**लाभार्थी निवडीची कार्यपद्धती :-**

कृषि-हवामान क्षेत्रानुकूल असणाऱ्या फळ पिकांपैकी प्रकल्पांतर्गत मंजूर असलेल्या कोणत्याही पिकाची योजनेंतर्गत अनुज्ञेय किमान व कमाल क्षेत्र मर्यादेपर्यंत लागवड करण्याची शेतकऱ्यांना मुभा राहील.

**पूर्वसंमती प्रदान करणे:**

१. लाभार्थ्याने पूर्वसंमती मिळाल्याच्या दिनांकापासून ७५ दिवसांमध्ये सर्व बाबींसह फळबागेची लागवड करणे आवश्यक राहील.

२. जे लाभार्थी पूर्वसंमती नंतर ७५ दिवसांत सर्व बाबींसह फळबागेची लागवड करणार नाहीत त्यांची पूर्वसंमती रद्द समजण्यात यावी.

**तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी :**

१. प्रकल्पांतर्गत वार्षिक कृती आराखड्यास सुकाणू समितीने मान्यता प्रदान केलेली असल्यामुळे सदर प्रस्तावास पुन्हा प्रशासकिय मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

२. प्रत्येक लाभार्थीच्या जमिनीवरील फळबाग लागवड हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात येईल. अशा प्रत्येक प्रकल्पासाठी तांत्रिक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात यावी. लागवड करावयाच्या फळझाड व क्षेत्रानुसार प्रकल्पांतर्गत मंजूर केलेल्या मापदंडाप्रमाणे स्वतंत्रपणे अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे.

**फळबाग लागवड व अनुदान वितरण :**

१. प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन योजना तसेच इतर योजनेतून ठिबक सिंचनाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास सदर संच हा नवीन फळबाग लागवड करण्यासाठी योग्य असल्यास त्याच सर्वे नंबर/गट नंबर करिता ठिबक सिंचन या बाबीचे अनुदान वजा करून इतर बाबीवरील अनुदान द्यावे.

२. ठिबक सिंचन संचाचा वापर करताना पिक/फळपिक निहाय अंतरानुसार ठिबक सिंचन संच वापरणे तांत्रिक दृष्ट्या आवश्यक आहे, तरी ठिबक सिंचन या बाबीकरिता फळबाग लागवड योजनेअंतर्गत अनुदान देणे क्रमप्राप्त आहे.

३. क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर बदलण्यास परवानगी देण्यात यावी मात्र नियमानुसार अनुदान शासनाने अनुज्ञेय केल्याप्रमाणे राहील.

**संनियंत्रण, मूल्यमापन व लेखापरीक्षण:**

१. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाव्दारे सदर योजनेचे संनियंत्रण करण्यात येईल तसेच, क्षेत्रीय पातळीवर योजनेची अंमलबजावणी करताना विविध स्तरावरील अधिकाऱ्यांनी संनियंत्रण (CONCURRENT EVALUATION) करावे. झालेल्या कामाची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध स्तरीय अधिकाऱ्यांच्या तपासणीचे प्रमाण लाभार्थी संख्येनुसार खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

| कार्यालय स्तर | तपासणीचे प्रमाण |
|---|---|
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - ५ टक्के |
| उपविभागीय कृषि अधिकारी | - १० टक्के अनुदान अदायगी पूर्व |
| कृषि पर्यवेक्षक | - २५ टक्के |
| कृषि सहाय्यक | - १०० टक्के |

२. सदर योजनेंतर्गत झालेल्या कामाचे दस्तऐवज वार्षिक लेखा परीक्षणासाठी जतन करून ठेवावेत व कृषि सहाय्यक यांनी लेखा परीक्षणास उपलब्ध करुन द्यावेत .

**गुणवत्तापूर्ण कलमांचा पुरवठा :**

१. लाभार्थ्याने फळबाग लागवडीकरिता कलमची निवड स्वत: करावयाची असून, कलमे खरेदी करताना खालीलप्रमाणे रोपवाटिकांना प्राधान्य देण्यात यावे.
   I. कृषि विभागाच्या रोपवाटिका
   II. कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिका
   III. राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिका
   IV. कृषि विभागाच्या परवाना धारक खाजगी रोपवाटिका

वरीलप्रमाणे कलमे खरेदी करताना त्यांच्या दर्जाबाबतची खात्री लाभार्थ्याने स्वत: करावयाची आहे. लाभार्थी शेतकऱ्याने खरेदी केलेल्या कलमांच्या देयकाची रक्कम व कलमांकरिता ठरविण्यात आलेली शासकीय अनुदानाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

२. लाभार्थ्याने, मानांकित खाजगी रोपवाटिकेतून कलमांची खरेदी केल्यास त्यांच्या दर्जाबाबतची जबाबदारी संबधित लाभार्थ्याची राहील.
३. इच्छुक शेतकऱ्यांना लिंबू आणि सिताफळ या फळझाडांची लागवड करण्यासाठी कलमे उपलब्ध होत नसल्यास रोपांद्वारे देखील लागवड करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच लाभार्थी शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार कलमे/रोपे लागवड करण्यास परवानगी देण्यात येत आहे. त्यासाठी खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना कृषि आयुक्तालयाने निश्चित केलेले रोपांचे दर विचारात घ्यावेत.

**उपयोगिता प्रमाणपत्र-**

खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडील लेखा शाखेने दिलेल्या नमुन्यात उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सादर करावे.

**अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-**

**लाभार्थी**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून फळपिकनिहाय अर्ज करावा व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.
२. जर लाभार्थी संयुक्त खातेदार असल्यास, इतर सर्व खातेदारांचे संमतीपत्र घेण्याची जबाबदारी संबधित लाभार्थीची राहील.
३. पूर्वसंमती मिळाल्यानंतर लाभार्थ्याने फळबाग लागवडीची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी.

४. सदर घटकाचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्याने जमीन आरोग्य पत्रिका काढावी. या मार्गदर्शक सूचनेनुसार शेतकऱ्याने स्व-खर्चाने करावयाची कामे यांचा तपशील देण्यात आलेला आहे,त्यानुसार सर्व कामे करण्याची जबाबदारी संबधित लाभार्थ्यांची राहील.
५. ग्राम कृषि संजीवनी समिती व संबधित कृषि सहाय्यकामार्फत शासकीय अथवा शासनाची मंजुरी असलेल्या खाजगी रोपवाटिकेतून परवानापत्राद्वारे रोखीने कलमे/रोपे घ्यावीत.
६. शेतकऱ्यांनी खाजगी रोपवाटिका प्रमुखाकडे थेट संपर्क करुन कलमांची/रोपांची रोख खरेदी करु इच्छित असल्यास अशा शेतकऱ्यांनी रोखीने कलमे /रोपे उपलब्ध करुन घ्यावीत.
७. लाभार्थ्याने, राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिकेतून कलमांची खरेदी केल्यास त्यांच्या दर्जाबाबतची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.
८. जिवंत झाडांची विहीत प्रमाणातील टक्केवारी (प्रथम वर्ष -८०%, द्वितीय वर्ष -९०%) राखण्याची जबाबदारी संपूर्णपणे लाभार्थ्याची असेल.
९. कृषि सहाय्यकामार्फत नियोजित प्रकल्प क्षेत्राची पाहणी करून शिफारस केल्यानंतर व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिल्यावर लाभार्थीनी प्रत्यक्ष कलमे/रोपे लागवड करावी व देय अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी व कलमे /रोपे खरेदीची पावती संकेतस्थळावर अपलोड करावी.

**ग्राम कृषि संजीवनी समिती**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.
२. फळबाग लागवडीसाठी प्राप्त झालेल्या मागणी अर्जापैकी पात्र शेतक-यामधून प्रकल्पांतर्गत लाभार्थी निवडीच्या मार्गदर्शक सुचनानुसार समितीने प्राधान्य क्रमाने लाभार्थी निवड करुन यादी संबधित उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे समूह सहाय्यक यांच्यामार्फत ठराव संकेतस्थळावर अपलोड करावी.
३. गावाच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील फळपिके व क्षेत्र मर्यादेच्या अधीन राहून ग्राम कृषि संजीवनी समितीने पात्र लाभार्थ्याची निवड करावी.
४. इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
५. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षणास संबधित कृषि सहाय्यक/ प्रकल्प यंत्रणा यांना मदत करावी.

**समूह सहाय्यक**

१. गाव समूहातील इच्छुक लाभार्थींना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. इच्छुक लाभार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करावा.
४. लाभार्थ्यास फळबाग लागवड या घटकाच्या अटी, शर्ती व तांत्रिक/आर्थिक निकष समजावून सांगणे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज व सोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. सदर फळबाग लागवडीची व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प गावामध्ये भिंतीपत्रके ग्राम पंचायतीचे/गावाचे नोटीस बोर्डवर लावण्यात यावीत, तसेच वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/भेटी व्दारे सदर प्रकल्प घटकाचा प्रचार करण्यात यावा.

३. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छाननी आधारे पात्र अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तपासणी सूचीनुसार पाहणी करून प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. सदर योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार वैयक्तिक क्षेत्रावरील लागवडीसाठी विहित नमुन्यात अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व संकेतस्थळावर अपलोड करावे.
५. तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेनंतर कृषि विभागाच्या शासकीय किंवा खाजगी रोपवाटिकेतून कलमे/रोपे नमूद केलेल्या रोपांचा प्रकार व संख्येनुसार शेतकऱ्यांना आवंटीत करून द्यावीत.
६. लाभार्थ्यांनी लागवड पूर्ण करताच तपासणी करुन त्याची मापनपुस्तिकेत नोंद घ्यावी व शेतकऱ्यांना द्यावयाचे अनुदानाची परिगणना करावी.
७. लाभार्थ्यांनी नियोजित प्रकल्प क्षेत्रावर कलमे/रोपे लागवड केल्यानंतर व ऑनलाईन कळविल्यानंतर मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे योग्य असल्याबाबत तपासणी करून मोका तपासणी अहवाल व मापनपुस्तिकेतील नोंदी, देयके व आवश्यक कागदपत्र प्रमाणित करून देय अनुदानाच्या शिफारशीसह ऑनलाईन अपलोड करावा.
८. मोका तपासणीवेळी लाभार्थीसह प्रकल्प क्षेत्राचे DBT App द्वारे नैऋत्य कोपरा बाजूवरुन भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करावे.
९. एकूण झालेल्या लागवडीची १००% तपासणी अनुदान अदायगी पूर्वी करण्याची जबाबदारी संबधित कृषि सहाय्यकाची असेल.
१०. फळबाग लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन शिफारस केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी लाभार्थी संख्येच्या २५% लाभार्थ्यांची फळबाग लागवड तपासणी अनुदान अदायगी पूर्वी करावी व याबाबतच्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित कराव्यात. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. सदर फळबाग लागवडीची व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प गावामध्ये भित्तीपत्रके ग्राम पंचायतीचे/गावाचे नोटीस बोर्डवर लावणे, तसेच वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/भेटी व्दारे सदर प्रकल्प घटकाचा प्रचार करण्याच्या सूचना कृषि सहाय्यकांना देणे.
२. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांच्या छाननी नंतर पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबधित लाभार्थी यांना ऑनलाईन पूर्वसमंती प्रदान करावी व लाभार्थी शासकीय अथवा कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिकेतून कलमे/रोपे उचल करणार असल्यास उचल करण्यासाठी लाभार्थ्यास परवाना देण्यात यावा. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
३. फळबाग लागवडीच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता ऑनलाईन द्यावी.
४. पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणकानुसार मापनपुस्तिकेत घेतलेल्या नोंदी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करुन मापदंडानुसार देय असलेले अनुदान DBT द्वारे लाभार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यामध्ये अदा करण्यास मंजुरी द्यावी.

५. लाभार्थ्याने कलमे खरेदी शासनमान्य खाजगी रोपवाटिकेतून केल्यास शासकीय अनुदानाची रक्कम व देयकाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान लाभार्थ्यास देण्यात यावे.
६. फळबाग लागवडीची नोंद लाभार्थ्याच्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी लागवड पूर्ण होताच संबधित तलाठ्यास लेखी कळवावे व लेखी कळविल्याची पोहोच दप्तरी जतन करुन ठेवावी.
७. यादृच्छिक (Random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या १०% तपासणी अनुदान अदायगी पूर्वी करावी.
८. लाभार्थ्यांना घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे.
९. योजनेचे सनियंत्रण करणे.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या किमान ५% तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.

## <u>गोषवारा</u>

प्रकल्प अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९ (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये॰ आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | फळ पिक कलमे / नारळ रोपे | अंतर (मी.) | हेक्टरी झाडे | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | आंबा | ५ X ५ | ४०० | ३००४४ | ५८९१४ | **८८९५८** | १४८ | ४६६९ | ५०५० | **९७१९** | २३ | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | ३७७५८ | ६४२१४ | **१०१९७२** | १८६ |
| २ | डाळींब | ४.५ X३ | ७४० | २८०१४ | ६४९९९ | **९३०१३** | १३८ | ५६८४ | ५९५५ | **११६३९** | २८ | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | ३७७५८ | ७१७२९ | **१०९४८७** | १८६ |
| ३ | पेरू | ३ X २ | १६६६ | ३८५७० | १४०९८६ | **१७९५५६** | १९० | ३६५४ | १६७५० | **२०४०४** | १८ | २०३० | १०० | **२१३०** | १० | ४४२५४ | १५७८३६ | **२०२०९०** | २१८ |
| ४ | पेरू | ६ X ६ | २७७ | ११९७७ | ४४४८४ | **५६४६१** | ५९ | १८२७ | २८५० | **४६७७** | ९ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १४८१९ | ४७४३४ | **६२२५३** | ७३ |
| ५ | संत्रा | ६ X ३ | ५५५ | १९४८८ | ६४३३४ | **८३८२२** | ९६ | ५६८४ | ५८५० | **११५३४** | २८ | ४०६० | ३०० | **४३६०** | २० | २९२३२ | ७०४८४ | **९९७१६** | १४४ |
| ६ | संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू | ६ X ६ | २७७ | १२९९२ | ४१९१४ | **५४९०६** | ६४ | २८४२ | २५०० | **५३४२** | १४ | २०३० | ३०० | **२३३०** | १० | १७८६४ | ४४७१४ | **६२५७८** | ८८ |
| ७ | सिताफळ | ५ X ५ | ४०० | १५२२५ | ५०८६४ | **६६०८९** | ७५ | १८२७ | ३४०० | **५२२७** | ९ | १०१५ | २०० | **१२१५** | ५ | १८०६७ | ५४४६४ | **७२५३१** | ८९ |
| ८ | आवळा | ७ X ७ | २०० | ९७४४ | ३६००८ | **४५७५२** | ४८ | १४२१ | १६७५ | **३०९६** | ७ | ८१२ | ७५ | **८८७** | ४ | ११९७७ | ३७७५८ | **४९७३५** | ५९ |

## तक्ता - १ : आंबा कलमे (सघन लागवड)

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी ४०० (अंतर ५ X ५ मी.)

(मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६X०.६X०.६ मी. आकार एकूण खड्डे ४०० | १९८९४ | ० | **१९८९४** | ९८ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **१९८९४** | **०** | **१९८९४** | **९८** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ६०/ प्रति कलम ,संख्या-४०० | ८१२० | २४००० | **३२१२०** | ४० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **८१२०** | **२४०००** | **३२१२०** | **४०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | ४८०० | **६४२४** | ८ | ० | ० | **०** | ० | **१६२४** | **४८००** | **६४२४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३४६६४ | **३४६६४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **०** | **३४६६४** | **३४६६४** | **०** |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | २५० | **२२८०** | १० | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | **८१२०** | **७५०** | **८८७०** | **४०** |
| **एकूण** | | **३००४४** | **५८९१४** | **८८९५८** | **१४८** | **४६६९** | **५०५०** | **९७१९** | **२३** | **३०४५** | **२५०** | **३२९५** | **१५** | **३७७५८** | **६४२१४** | **१०१९७२** | **१८६** |

## तक्ता - २ : पेरु कलमे (सघन लागवड)

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - १६६६ (अंतर - ३ X २ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.३X०.३X०.३ मी. आकार एकूण खड्डे १६६६ | २४३६० | ० | **२४३६०** | १२० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | २४३६० | ० | **२४३६०** | १२० |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ५० प्रति कलम, संख्या-१६६६ | १२१८० | ८३३०० | **९५४८०** | ६० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | १२१८० | ८३३०० | **९५४८०** | **६०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | १६६५० | **१८२७४** | ८ | ० | ० | **०** | ० | १६२४ | १६६५० | **१८२७४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ५७५८६ | **५७५८६** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ५७५८६ | **५७५८६** | ० |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | १०० | **२१३०** | १० | २०३० | १०० | **२१३०** | १० | २०३० | १०० | **२१३०** | १० | ६०९० | ३०० | **६३९०** | **३०** |
| **एकूण** | | **३८५७०** | **१४०९८६** | **१७९५५६** | **१९०** | **३६५४** | **१६७५०** | **२०४०४** | **१८** | **२०३०** | **१००** | **२१३०** | **१०** | **४४२५४** | **१५७८३६** | **२०२०९०** | **२१८** |

## तक्ता – ३ : पेरु कलमे

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी – २७७ (अंतर – ६ X ६ मी.)

(मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६ X ०.६X०.६ मी. आकार एकूण खड्डे २७७ | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ५० प्रति कलम, संख्या-२७७ | ४०६० | १३८५० | **१७९१०** | २० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ४०६० | १३८५० | **१७९१०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | ८१२ | २७५० | **३५६२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | २७५० | **३५६२** | **४** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | ३०४५ | ३०० | **३३४५** | **१५** |
| **एकूण** | | **११९७७** | **४४४८४** | **५६४६१** | **५९** | **१८२७** | **२८५०** | **४६७७** | **९** | **१०१५** | **१००** | **१११५** | **५** | **१४८१९** | **४७४३४** | **६२२५३** | **७३** |

## तक्ता - ४ : डाळिंब कलमे

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - ७४० (अंतर - ४.५ X ३ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.३X०.३X०.३ मी. आकार एकूण खड्डे ७४० | १८६७६ | ० | **१८६७६** | ९२ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | १८६७६ | ० | **१८६७६** | **९२** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ३५ प्रति कलम, संख्या-७४० | ७३०८ | २५९०० | **३३२०८** | ३६ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ७३०८ | २५९०० | **३३२०८** | **३६** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५१८० | **६८०४** | ८ | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५१८० | **६८०४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३८८२४ | **३८८२४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३८८२४ | **३८८२४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | २७५ | **२३०५** | १० | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | १०१५० | १८२५ | **११९७५** | **५०** |
| **एकूण** | | **२८०१४** | **६४९९९** | **९३०१३** | **१३८** | **५६८४** | **५९५५** | **११६३९** | **२८** | **४०६०** | **७७५** | **४८३५** | **२०** | **३७७५८** | **७१७२९** | **१०९४८७** | **१८६** |

## तक्ता - ५ : संत्रा / मोसंबी / कागदी लिंबू कलमे

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - २७७ (अंतर - ६ X ६ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६X ०.६X०.६ मी. आकार एकूण खड्डे २७७ | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ६९०२ | ० | **६९०२** | **३४** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ४० प्रति कलम, संख्या-२७७ | ४०६० | ११०८० | **१५१४०** | २० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ४०६० | ११०८० | **१५१४०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | ८१२ | २२०० | **३०१२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | २२०० | **३०१२** | **४** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३०५३४ | **३०५३४** | **०** |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | ३०० | **२३३०** | १० | २०३० | ३०० | **२३३०** | १० | २०३० | ३०० | **२३३०** | १० | ६०९० | ९०० | **६९९०** | **३०** |
| | **एकूण** | **१२९९२** | **४१९१४** | **५४९०६** | **६४** | **२८४२** | **२५००** | **५३४२** | **१४** | **२०३०** | **३००** | **२३३०** | **१०** | **१७८६४** | **४४७१४** | **६२५७८** | **८८** |

## तक्ता – ६ : संत्रा कलमे (इंडो-इस्त्राईल पद्धत)

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी – ५५५ (अंतर – ६ X ३ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण –रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन –संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | गादी वाफे तयार करणे – १.२१ चौ.मी. X १५५२ मी = १८७८.०४ घ.मी. | ८५२६ | ० | **८५२६** | ४२ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ८५२६ | ० | **८५२६** | **४२** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ५० प्रति कलम, संख्या-५५५ | ८१२० | २७७५० | **३५८७०** | ४० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ८१२० | २७७५० | **३५८७०** | **४०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५५५० | **७१७४** | ८ | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५५५० | **७१७४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३६२८४ | **३६२८४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३६२८४ | **३६२८४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | २८४२ | ३०० | **३१४२** | १४ | ४०६० | ३०० | **४३६०** | २० | ४०६० | ३०० | **४३६०** | २० | १०९६२ | ९०० | **११८६२** | **५४** |
| **एकूण** | | **१९४८८** | **६४३३४** | **८३८२२** | **९६** | **५६८४** | **५८५०** | **११५३४** | **२८** | **४०६०** | **३००** | **४३६०** | **२०** | **२९२३२** | **७०४८४** | **९९७१६** | **१४४** |

## तक्ता - ७ : सिताफळ कलमे

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - ४०० (अंतर - ५X ५ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६ X०.६X०.६ मी. आकार एकूण खड्डे ४०० | १०१५० | ० | **१०१५०** | ५० | **०** | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | १०१५० | ० | **१०१५०** | **५०** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ४० प्रति कलम, संख्या-४०० | ४०६० | १६००० | **२००६०** | २० | **०** | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ४०६० | १६००० | **२००६०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | **८१२** | ३२०० | **४०१२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | ३२०० | **४०१२** | **४** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३४६६४ | **३४६६४** | ० | **०** | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३४६६४ | **३४६६४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | १०१५ | २०० | **१२१५** | ५ | **१०१५** | २०० | **१२१५** | ५ | १०१५ | २०० | **१२१५** | ५ | ३०४५ | ६०० | **३६४५** | **१५** |
| **एकूण** | | **१५२२५** | **५०८६४** | **६६०८९** | **७५** | **१८२७** | **३४००** | **५२२७** | **९** | **१०१५** | **२००** | **१२१५** | **५** | **१८०६७** | **५४४६४** | **७२५३१** | **८९** |

## तक्ता - ८ - आवळा कलमे

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - २०० (अंतर - ७ X ७ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये॰)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६X०.६X०.६ मी. आकार एकूण खड्डे २०० | **५०७५** | ० | **५०७५** | २५ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ५०७५ | ० | **५०७५** | **२५** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ४० प्रति कलम, संख्या-२०० | **४०६०** | ८००० | १२०६० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४०६० | ८००० | **१२०६०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | **०** | ० | **०** | ० | ८१२ | १६०० | **२४१२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | १६०० | **२४१२** | ४ |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | **०** | २७९३३ | **२७९३३** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | २७९३३ | **२७९३३** | ० |
| ५ | पीक संरक्षण | **६०९** | ७५ | **६८४** | ३ | ६०९ | ७५ | **६८४** | ३ | ८१२ | ७५ | **८८७** | ४ | २०३० | २२५ | **२२५५** | **१०** |
| | **एकूण** | **९७४४** | **३६००८** | **४५७५२** | **४८** | **१४२१** | **१६७५** | **३०९६** | **७** | **८१२** | **७५** | **८८७** | **४** | **११९७७** | **३७७५८** | **४९७३५** | **५९** |

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. ________ | |
| ६. | बाब | फळबाग | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ८. | कामाचा कालावधी | | |
| ९. | फळबागेचे क्षेत्र (हे. आर.) | | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. फळबाग क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र.-<br>२. फळपिकाचे नाव /वाण-<br>३. तपासणी पूर्वी रोप संख्या हेक्टरी-<br>४. सध्य स्थितीत जिवंत रोप संख्या-<br>५. रोपांमधील अंतर- | |
| ११. | पिक संरक्षक बाबींची उपाय योजना प्रत्यक्षात केली आहे काय? | | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्यास शिफारस करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १४. | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १५. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १६. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |

| १७. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|
| | |

कृषि सहाय्यक यांचे मोका तपासणी, मंजूर आराखडा व मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण झाले असून त्याबाबत मी स्वत: खात्री केली आहे. मापनपुस्तिकेतील नोंदी योग्य असून त्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन प्रमाणित केलेल्या आहेत. सदर लागवडीचा दर्जा योग्य आहे.

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव....................)**